


## औद्योगिक संधींचा मार्ग !

राज्यातील साडेतीन शक्तिपीठे आणि दोन ज्योतिर्लिंगे यांना जोडणाऱ्या बहुचर्चित शक्तिपीठ महामार्गावरून सध्या गदारोळ सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा ‘ड्रीम प्रोजेक्ट.’ विधानसभा निवडणुकीत नाराजी टाळण्यासाठी महायुती सरकारने या प्रकल्पाला ‘ब्रेक’ लावला. मात्र, काही दिवसांपूर्वीच त्याच्या भूसंपादनाला मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला. कोल्हापूरवासीयांसह काही पक्ष-संघटना त्याविरोधात आंदोलनाची मोट बांधत आहेत. अशात सुरत-चेन्नई महामार्गसुद्धा ‘सत्तीच्या मार्गा’ने नेण्याचे सरकारने ठरवलेले दिसते. शेतकऱ्यांच्या विरोधानंतरही या प्रकल्पातील नाशिक-सोलापूर या ४१३ किमीच्या पहिल्या टप्प्यावर केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मंजुरीची मोहोर उमटवली. आता मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव जाईल.

उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा १,२७१ किमीचा हा महत्त्वाकांक्षी मार्ग आता भारतमाला योजनेअंतर्गत नव्हे, तर ‘बीओटी’ तत्त्वावर उभारला जाईल. त्यासाठी सुमारे पन्नास हजार कोटी रुपये खर्ची पडतील. त्याच्या भूसंपादनाला केंद्राच्या अर्थ मंत्रालयाने काही महिन्यांपूर्वी स्थगिती दिल्याने हा प्रकल्प गुंडाळल्याची चर्चा होती. शेतजमीन वाचणार असल्याने नाशिक जिल्ह्यातील ६९ गावांनी आनंदोत्सवही साजरा केला. परंतु, ही स्थगिती केवळ ‘भारतमाला’च्या तांत्रिक कारणामुळे होती आणि कोणत्याही परिस्थितीत राज्य सरकार हा प्रकल्प पूर्णत्वास नेणार, असे स्पष्ट झाले आहे. स्वत: मुख्यमंत्री त्यासाठी आग्रही आहेत. शरद पवार यांच्या विनंतीवरून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने अनौपचारिकपणे दिलेली स्थगितीसुद्धा निवडणूक काळापुरतीच होती, हेही उघड झाले आहे.

‘ग्रीनफिल्ड’ प्रकल्पामुळे चेन्नई ते सुरत प्रवास ३६ ऐवजी १८ तासांत होऊ शकेल. नाशिक ते सुरत हा प्रवासही अवघ्या तीन तासांत शक्य होईल. उत्तर महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या या मार्गाचे सामर्थ्य जमीनमालकांनाही ठाऊक आहे. परंतु, केंद्र-राज्य सरकारांकडून संवादाचा नेमका सेतू उभारला न गेल्याने अडचणी वाढत गेल्या. भूसंपादनात अडथळे निर्माण झाले. एकट्या नाशिक जिल्ह्यात एक हजार हेक्टर भूसंपादनाचा खोळंबा झाला. अलीकडे बाजारभावापेक्षा अधिक भरपाई मिळत असल्याने प्रकल्पांना जमीन देण्याला विरोध काहीसा कमी झाला आहे. परंतु, समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर विशेष सूत्राने मोबदला मिळावा, ही जमीनमालकांची मागणी आहे. त्यांना अद्याप ठोस आश्वासन मिळालेले नाही. अर्थात, या मार्गासाठीची वृक्षतोड, पर्यावरणाची समस्या हा मुद्दाही चिंतेचा आहेच.

दोन दशकांत महामार्गांच्या विस्तारलेल्या जाळ्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर या तीन महानगरांसह राज्यातील इतर शहरांशी नाशिकचा उत्तम ‘कनेक्ट’ निर्माण झाला. आता नव्या मार्गामुळे सुरत, सोलापूर, हैदराबाद आणि चेन्नई या चार औद्योगिक शहरांशीही बंध अधिक घट्ट होईल. वाढवण बंदराची उभारणी पूर्ण होईल तशी त्याची फळे स्पष्टपणे दिसतील. मात्र, अडथळ्यांच्या कोंडीतून महामार्ग बाहेर काढायचा असल्यास शेवटच्या घटकापर्यंत संवाद-समन्वयाचे मार्ग खुले ठेवावे लागतील. रस्ते प्रगतीचे वाहक असतात. कोणत्याही सरकारचे वा स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन तेथील रस्त्यांच्या दर्जावरून केले जाते. परंतु, केवळ चकचकीत रस्ते हाच विकासाचा मापदंड नाही. परिसराच्या गरजांनुसार नेमके उद्योग-व्यवसाय उभे राहायला हवेत, व्यावसायिकांना सोयी-सवलती मिळायला हव्यात. ज्यांच्यासाठी विकासाचा खटाटोप केला जातो, त्या प्रत्येक घटकापर्यंत त्याचे लाभ पोहोचायला हवेत.

नव्या महामार्गातून हे घडो, ही अपेक्षा!

# राज्य सह.बँकेचा थेट कर्जपुरवठा कितपत शक्य होईल.?

राज्य सहकारी बँकेचे शेतकऱ्यांना पाठबळ आणि विकास संस्थांना राज्य सहकारी बँकेचा थेट कर्ज पुरवठा होणार अशी बातमी परवा वाचण्यात आली. सध्या शेतकऱ्यांना कर्ज पुरावा त्रिस्तरीय होतो. म्हणजे एम. एस. सी. बँके कडून( महाराष्ट्र राज्य सहकारी बँक. शिखर बँक) जिल्हा बँकेला आणि जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना खरीप आणि रब्बी हंगामासाठी कर्ज पुरवठा होत असतो. साठ ते पासष्ट टक्के कर्जपुरवठा हा विका संस्था आणि जिल्हा बँकेचे माध्यमातून होतो.

परंतु गेल्या काही वर्षांमध्ये एकूणच परिस्थिती अशी झाली आहे की कर्जमाफी च्या घोषणाकडे डोळे लागलेले असतात. निवडणुका आल्या की कुठलाही विचार न करता कर्जमाफी होणार, सातबारा कोरा करणार, अशा बातम्या वर्तमानपत्रात,प्रसारमाध्यमातून माध्यमातून झळकू लागतात. प्रचार सभा मध्ये आश्वासन दिले जाते आणि मग ती कर्जमाफी कशी होणार ? कोणाला होणार ? किती होणार ? हे सगळं काही जाहीर झालेले नसते. फक्त कर्जमाफी होणार आणि मग त्यामुळे साहजिकच आपण जर कर्ज भरले तर आपल्याला कर्जमाफी होणार नाही. हे तितकच सत्य असत. त्यामुळे खूप सारे शेतकरी कर्ज न भरण्याचे निर्णयाप्रत येतात.

आज रोजी महाराष्ट्रात जवळपास २१००० विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. यांची परिस्थिती बघितली तर त्या त्या भागानुसार संस्थांची परिस्थिती आहे. जो काही थोडाफार सधन भाग आहे त्या ठिकाणी विकास संस्थांची परिस्थिती बरी आहे. परंतु जवळपास ६५/७० टक्के संस्थांची परिस्थिती ही आवाक्या बाहेर गेलेली आहे. थोडक्यात या संस्थांमध्ये आणि बँक कर्जामध्ये अनिष्ट तफावत निर्माण झालेली आहे.

आता अनिष्ट तफावत म्हणजे काय ? तर बँकेचे कर्ज जास्त झाले आहे आणि संस्थेचे सभासदांकडून येणारे कर्ज त्यापेक्षा बरेच कमी आहे. म्हणजे जर एखाद्या संस्थेकडे बँकेचे ८० लाख रुपये देणे असेल तर त्या संस्थेत सभासंकडून येणे ५० लाखच रुपये दिसत आहे. म्हणजे त्यात तीस लाखांची तफावत दिसत आहे. आणि अशी तफावत मात्र कधीच भरून निघत नसते.ती वाढतच असते. ज्या वेळेला शंभर टक्के कर्ज माफ होईल आणि बँक लेव्हलला ती रक्कम जमा होऊन उर्वरित रक्कम जर बँकेला शासनाकडून मिळाली तरच ती तफावत भरून निघणार आहे नाहीतर हे असेच चक्र अव्यहातपणे सुरू राहणार आहे यात काही शंका नाही.

वि.का संस्थांना खर्चासाठी वेगळा निधी नसतो त्यांना जे मार्जिन मिळते त्यातूनच तो खर्च होत असतो. बऱ्याच वेळा अनेक संस्थांमध्ये खर्चावर नियंत्रण नसते. आदरातिथ्य, स्टेशनरी, कारकून पगार, जाहिराती,जागा भाडे, आदी गोष्टीवर खर्च होतो. आणि त्यामुळे तो खर्चही वसुलातूनच होत असल्यामुळे तफावत पडत असते. अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संस्था पातळीवर अल्पमुदत कर्जावरील व्याज मुद्दला इतकेच घेतले जाते. त्यावरती व्याज आकारणी होत नाही परंतु बँक पातळीवर बँक संस्थेकडून व्याज वसूलच करत असते त्यामुळे दोघांचे कर्जामध्ये तफात पडते.

राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी जवळपास २० बँका अडचणीत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना जिल्हा बँकेकडून होणार वित्त पुरवठा बंद झाला आहे. कर्ज मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत येत असून यात लक्ष घालून शेतकऱ्यांना मदत करण्याची सूचना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि कार्यवाहीलाही सुरुवात झाली आहे.असे म्हटले आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो सेवा सोसायट्यांना आधार मिळणार आहे.अशी भावना आहे. हे किती प्रमाणात शक्य होते हे येत्या काही दिवसात समजेलच. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या किंवा बंद पडलेल्या काही जिल्हा बँकामधून विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा होत नव्हता. त्यामुळे अनेक गावातील शेतकऱ्यांना हंगामासाठी कर्ज मिळू शकत नाही. त्यामुळे हंगामासाठी पैसे हवे असतील तर इतर पर्यायांचा अवलंब करावा लागत असल्याची बाब शेतकऱ्यांनी आणि संस्थांनी निदर्शनास आणून दिली होती.

राज्य सहकारी बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी आता या विविध कार्यकारी सोसायट्यांनाही काही निकष पाळून वित्त पुरवठ्याबाबत राज्य सहकरी बँकेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. ज्या विविध कार्यकारी सोसायट्या गेली तीन वर्षे नफ्यात आहेत, ज्यांचा एनपीए १० टक्क्यांपेक्षा कमी आहे आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत, अशा सोसायट्यांना थेट वित्त पुरवठा करण्याचा निर्णय




राज्य सहकारी बँकेने घेतला आहे. अशा संस्थांनी जिल्हा बँकांमार्फत कर्जाची मागणी करायची आहे. जर राज्य सहकारी बँक थेट संस्थांना कर्ज पुरवठा करणार आहेत. तर मग त्यात जिल्हा सहकारी बँकेचा रोल काय असेल? कारण याआधी कर्ज वाटपाची त्रिस्तरीय व्यवस्था होतीच आणि आहे.



- दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव
मो.८९९९५६६९१७

राज्य सहकारी बँक जिल्हा बँकांना आणि जिल्हा बँका विविध कार्यकारी संस्थांना कर्ज पुरवठा करते. परंतु जाहीर निकषावर थेट कर्ज पुरवठा होणार असेल तर राहिलेल्या विकास संस्थांनी काय करावे ? त्यांना जिल्हा बँका कर्ज पूरवठा करणार का? हे सर्व प्रश्नांची उकल होत नाही.

जवळपास ६० ते ६५ टक्के संस्था या अनिष्ट तफावत आहे. या सोसायट्यांचे बाबतीत जर बघितले तर त्यांचा जो वसूल येतो तो संपूर्ण किंवा जवळपास बँक व्याजामध्ये जमा होतो. तो मुद्दलात थोडाफार जमा होतो, त्यामुळे एखाद्या संस्थेत जर ५०० कर्जदार सभासद असतील त्यातील दरवर्षी साधारणपणे दीडशे दोनशे कर्जदार आपले कर्ज निमित भारतात पण कर्जमाफीच्या घोषणामुळे जे काही नियमीत कर्ज भरणारे सभासद असतात तेही विचारात पडतात आणि आपण जर कर्ज भरले तर आपल्याला माफी मिळणार नाही म्हणून तेही कर्ज भरायला टाळाटाळ करत असतात. काही सभासद असे असतात की जे संस्थेचे सभासद कमी होवून राष्ट्रीयकृत बँकांकडे पलायन करतात. त्यामुळे इकडे सभासद संख्याही कमी होते. नियमित कर्ज भरणाऱ्यांना जरी काही प्रोत्साहन देण्याची घोषणा असते तरी ते केव्हा मिळतील याची शाश्वती नसते.

जिल्हा बँकेचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणजे विविध कार्यकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना दिल्या जाणारे खरीप रब्बी मध्यम मुदत कर्जा वरील व्याज हेच आहे. त्यातही बऱ्याच विकास संस्था मध्यम मुदत कर्ज देण्यासाठी अपात्र असतात म्हणजेच नियमात बसत नाही म्हणून असे कर्ज हे कमीच असते आणि बऱ्याच वेळा अशा कर्जामध्ये फसवणूक केली जाते आणि त्या कर्जाचा योग्य प्रकारे होत नसतो. काही ठरावीक संस्थाच आपला स्वत:चा व्यवसाय करून काही उत्पन्न मिळवतात जसे पेट्रोल पंप, गोडावून बांधकाम स्वस्त धान्य दुकान अशाप्रकारे.

जिल्हा बँका अडचणीत किंवा डबघाईला अनेक कारणे आहेत त्यात महत्त्वाचे म्हणजे होणारा अवाजवी खर्च. वाहनावरील खर्च, नूतनीकरण खर्च, स्टेशनरी आणि फर्निचर खर्च आणि त्यात वेळोवेळी होणारा भ्रष्टाचार.अकार्यक्षम कार्यकारी संचालकांच्या नेमणुका, याचबरोबर अजून एक महत्वाची म्हणजे पीक कर्ज व्यतिरिक्त जिल्हा बँका वैयक्तिक कर्ज देत नाहीत आणि दिले तरी योग्य रीतीने परतफेड होत नाही.तसेच राजकीय हेतूने सूतगिरण्या, साखर कारखाने,शिक्षण संस्था, नगरपालिका, यांना दिलेले कर्जही मोठ्या प्रमाणात थकीत असते व त्याला योग्यरित्या तारण नसते असे राजकीय संबंधापोटी बऱ्याच वेळा दिलेले कर्ज धोक्यात येते आणि त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर फटका बँकांना बसतो. आणि मग त्या बँका अडचणीत येतात.

कितीही वेळा आर्थिक गणिते जुळण्यासाठी मदत केली तर ती कमीच ठरणार आहे. तीन-चार वर्षांपूर्वी अशाच प्रकारे अडचणीत आलेल्या बँकांचे विलीनीकरण करण्याविषयी खूप चर्चा झाली होती पण त्यानंतर तेही बारगळले.

विविध कार्यकारी सेवा संस्था सक्षम असतील तर जिल्हा बँकाही सक्षम राहतील, फक्त दोघांनीही खर्चावर नियंत्रण ठेवून आर्थिक शिस्त आणावी हे महत्त्वाचे आहे. अन्यथा त्याकडे दुर्लक्ष झाल्यास सहकार चळवळीच्या दृष्टीने ती अत्यंत घातक गोष्ट ठरणार आहे हे विसरून चालणार नाही. त्यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.आपले राज्याचे केंद्रीय सहकार मंत्री या कामी लक्षणीय बदल घडवून आणतील ही अपेक्षा.

## राजी ना मा..

काय जाते विरोधका
सततमागे राजीनामा
जरासे खुट्ट होई जरी
जोरातवाजवे धमामा

चुकाकरे तोचं माणूस
कसा राजी होई नामा
मरण नाही खाण्याला
आपला हो खानसामा

उलट जरा वाही वारा
तयार ठेवा लवाजमा
एकआवाज द्या जोरा
समर्थक ते होती जमा

अभिषेक नवस करा
मंदिरा करा परिक्रमा
पटायला हवे पक्षाला
तोड नसे रे पराक्रमा

आशीर्वाद पक्षश्रेष्ठींचे
करु नकात मग तमा
स्थान करावे बळकट
दुखवेलं कोण उत्तमा

पुन्हा होई ओम् फस्स
खेळे शब्दांचा झिम्मा
बळी द्यावा कुणी तरी
कामास येतो निकम्मा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

# न फनकार तुझसा, तेरे बाद आया...
# मोहम्मद रफी तू बहोत याद आया...

आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकरांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२